विजय चव्हाण

दैनिक जनसत्य
नि:पक्ष नजर...,नि:पक्ष खबर...

# रेल्वे पोलीस अधीक्षकांचा संवेदनशील भागात दौरा

## भविष्यात पारधी समाजाचे समुपदेशन करण्याचा मानस पो. अधीक्षक श्रीकांत धिवरे



कुर्डूवाडी प्रतिनिधी. लोहमार्ग पोलीस अधिक्षक श्रीकांत धिवरे यांनी दौंड व कुर्डूवाडी रेल्वे पोलिस स्टेशनच्या दरम्यान रेल्वे हद्दीत सिग्नल कटिंग व चोरी सारखे गुन्हे घडू नयेत. त्याचप्रमाणे पारधी समाजातील मुलांना चांगले शिक्षण मिळावे व ते मूळ प्रवाहात यावेत. यासाठी विविध भागास गुरूवार४ मे रोजी भेट देऊन गुन्हे रोखण्यासाठी विशेष उपक्रम हाती घेतला.

कुर्डूवाडी, दौंड या वर्दळीच्या लोहमार्गावर सतत लूटमार तसेच चोरीच्या घटना बऱ्याचदा होतात. सिग्नल कटिंग करून प्रवाश्यांना लुटले जाते. या सर्व चोरीच्या विविध बाबींना आळा घालण्यासाठी लोहमार्ग पोलिसांनी पारधी समाजासाठी त्यांची उपजिविका व शिक्षणाचे महत्व पटवून देण्यासाठी मेळावा घेण्याचा निर्धार केला.

यावेळी दौंड, कुर्डूवाडी रेल्वे हद्दीत जीआरपी व आरपीएफ यांच्यासह चोख बंदोबस्त व पेट्रोलिंगचे नियोजन केले. त्याच बरोबर मुख्यालयामधील अतिरिक्त लोहमार्ग पोलिस कुर्डूवाडी, दौंड जीआरपीच्या मदतीसाठी तैनात करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे प्रवाशांनी स्टेशन व्यतिरिक्त अन्य ठिकाणी गाडी स्लो झाल्यास अथवा थांबल्यास खिडक्या दरवाजे बंद ठेवण्याचे आवाहन केले.

### समुपदेशन मेळावा घेण्याचा मानस

पोलिस अधिक्षक श्रिकांत धिवरे,पोलिस निरीक्षक संगिता हत्ती,दौंड लोहमार्ग सहायक पोलिस निरीक्षक कलगुटगे,पारधी समाज प्रतिनिधी नामदेव भोसले यांच्यासह समाज बांधव, पोलीस अधिकारी उपस्थित होते. भविष्यात पारधी समाजाचे समुपदेशन करण्यासाठी मेळावा घेण्याचा मानस पोलीस अधिक्षक धिवरे यांनी व्यक्त केला.

Main Edition
May 6, 2023 Page No. 8
Powered by : eReleGo.com

w-app 9850141355